आजचे भाव
सोने १,५९,३८० रु.
चांदी २,८५,००० रु.

www.newsdanka.com

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक
आर.एन.आय. रजिस्ट्रेश क्र. : MAHMAR/2022/83413

संपादकीय
मोदींनी केले काय? हा प्रश्न आज विचारायलाच हवा...

मुंबई | बुधवार, १० जून २०२६ >> वर्ष ४ >> अंक ३६ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी

## झटपट डंका

### पाकव्याप्त काश्मीरमध्ये संघर्षात ११ ठार



अलिकडच्या वर्षांत आर्थिक आणि राजकीय मुद्द्यांवरून अनेक आंदोलनांचे नेतृत्व करणाऱ्या जॉइंट आवामी अक्शन कमिटी (JAAC) या नागरी समाज संघटनेवर पाकिस्तानी सरकारने बंदी घातल्यानंतर पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमध्ये (POK) अशांतता निर्माण झाली आहे. माहितीनुसार, ९ जून रोजी नियोजित असलेल्या विभागीय बंदच्या पार्श्वभूमीवर रावलकोटमध्ये आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या संघर्षात किमान ११ जण ठार आणि ७० हून अधिक जण जखमी झाले.

>> पान...२ वर

### ग्रेट निकोबार विमानतळाला मंजुरी



भारताच्या सामरिक सुरक्षेला आणि हिंद महासागरातील प्रभावाला नवी ताकद देणारा महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. अंडमान-निकोबार द्वीपसमूहातील ग्रेट निकोबार बेटावर सुमारे १३ हजार कोटी खर्चून अत्याधुनिक ग्रीनफिल्ड विमानतळ उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भारतीय नौदलाच्या कॅम्पबेल बे येथील ‘आयएनएस बाज’ हवाई तळाच्या धावपट्टी विस्ताराची जुनी योजना अधिकृतपणे मागे पडली आहे. संरक्षण, व्यापार, पर्यटन आणि पायाभूत विकास या सर्वच दृष्टीने हा प्रकल्प देशासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

### मीनाक्षी नटराजन यांचा अर्ज फेटाळला



मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला आहे. पक्षाच्या उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळल्याने राज्यातील राजकीय वातावरण अचानक तापले आहे. भाजपने त्यांच्या नामांकनाविरोधात आक्षेप नोंदवल्यानंतर झालेल्या छाननीत अर्जातील महत्त्वाची माहिती लपवण्यात आल्याचे समोर आले आणि त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

# मोदींनी नेहरूंचा विक्रम मोडला

## देशात सर्वाधिक काळ पंतप्रधानपदावर राहिलेले नेते; ४,३९८ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र भारतात सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरूंचा विक्रम मोडला. ते देशाचे सर्वाधिक काळ निवडून आलेले पंतप्रधान बनले आहेत. त्यांनी एनडीएच्या तिसऱ्या कार्यकाळात ९ जून २०२४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली आणि आज त्यांच्या सत्तेला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत.**



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४,३९८ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत नेहरूंचा ४,३९७ दिवसांचा सर्वाधिक काळ निवडून आलेल्या पंतप्रधानांचा विक्रम मोडला.
- मोदी हे सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये (२०१४, २०१९, २०२४) विजय मिळवून तिसऱ्यांदा पंतप्रधान बनणारे नेहरूंनंतरचे दुसरे नेते ठरले आहेत.
- मार्च २०२६ मध्ये मोदी यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून मिळून ८,९३१ दिवसांहून अधिक काळ सत्तेत राहून पवन चामलिंग यांचा विक्रमही मागे टाकला.

पंतप्रधान मोदींनी २६ मे २०१४ रोजी पहिल्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती आणि आज ९ जून २०२६ पर्यंत त्यांच्या कार्यकाळाचे ४,३९८ दिवस पूर्ण झाले आहेत. आता ते सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहिलेले पंतप्रधान बनले आहेत.

भारताचे पहिले पंतप्रधान, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ मे १९५२ रोजी पहिल्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. नेहरूंनी सलग ४,३९७ दिवस, म्हणजेच १२ वर्षे आणि १४ दिवस पंतप्रधान म्हणून काम पाहिले. ९ जून रोजी पंतप्रधान मोदींनी सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवण्याचा नेहरूंचा विक्रम मोडला. नरेंद्र मोदी यांनी निवडून आलेले पंतप्रधान म्हणून ४,३९८ दिवस, म्हणजेच १२ वर्षे आणि १५ दिवस पूर्ण केले आहेत. नेहरू १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंतप्रधान झाले असले तरी, १९५२ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी त्यांनी पाच वर्षे अंतरिम सरकारचे नेतृत्व केले होते. तोपर्यंत नेहरूंनी कोणतीही निवडणूक जिंकून पंतप्रधानपद मिळवले नव्हते.

नेहरूंनी १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत पंतप्रधान म्हणून काम पाहिले. नेहरूंचा एकूण कार्यकाळ ६,१३० दिवसांचा आहे. तथापि, जवळपास पाच वर्षे त्यांनी अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधानपद भूषवले. २५ जुलै २०२५ रोजी पंतप्रधान मोदींनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा ४,०७७ दिवसांच्या सर्वाधिक सलग पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाचा विक्रम मोडला.

>> पान...३ वर

## तळेगाव एमआयडीसीत गॅसगळती, दोघांचा मृत्यू, तिघांची प्रकृती गंभीर

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



**रुग्णालयात उपचार सुरू असताना दोन कामगारांचा मृत्यू झाला असून तिघांची प्रकृती गंभीर आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली.**

✦ प्रशासन

पुणे जिल्ह्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरात घडलेल्या गॅसगळतीच्या भीषण दुर्घटनेने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. एका रासायनिक कंपनीत अचानक झालेल्या विषारी वायूच्या गळतीमुळे दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कामगार आणि स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेची भावना पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तळेगाव एमआयडीसीतील एका औद्योगिक युनिटमध्ये नियमित कामकाज सुरू असताना अचानक गॅसची गळती झाली.

>> पान...३ वर

## निदा खानने पीडितेला शिकवले नमाज पढायला



महाराष्ट्रातील नाशिक येथे एका टीसीएस कर्मचाऱ्याशी संबंधित कथित धर्मांतर प्रकरणात नवीन तपशील समोर आले आहेत. आरोपी निदा खान हिने पोलिस चौकशीत पीडितेला नमाज कसा अदा करायचा हे शिकवले होते आणि धार्मिक शिक्षणासाठी तिला नियमितपणे आपल्या घरी घेऊन जात होती, अशी कबुली दिल्याचे सांगितले जात आहे.

>> पान...३ वर

## वरळी ‘एनएससीआय’ डोम पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

### कॉन्सर्टमध्ये ११ मोबाईलवर डल्ला

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



वरळी येथील एनएससीआय डोम येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘आउटवर्ल्ड मुंबई’ म्युझिक कॉन्सर्टमध्ये एका बाजूला तरुणाच्या संशयास्पद मृत्यूची चर्चा असतानाच, आता तिथे मोबाईल चोरीच्या घटनांनी आयोजकांच्या सुरक्षिततेच्या दाव्यांचे पितळ उघडे पाडले आहे. या कार्यक्रमात चोरांनी हातसफाई करत ११ जणांचे महागडे मोबाईल लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

शनिवारी एनएससीआय डोम येथे आयोजित या कॉन्सर्टमध्ये हजारो तरुणांची गर्दी उसळली होती.

>> पान...३ वर

## मुंबईतील १९,७३४ संशयित जन्मदाखले रद्द होणार

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com







मुंबई महानगरपालिकेकडून “स्पेलिंग दुरुस्ती” च्या नावाखाली जारी करण्यात आलेल्या तब्बल १९,७३४ जन्म प्रमाणपत्रांवर राज्य सरकारने मोठी कारवाई सुरू केली आहे. आरोग्य सेवा आयुक्तालयाने मुंबई महापालिकेला संबंधित जन्मनोंदींची तपासणी करून त्या रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सोशल मीडियावर यासंदर्भातील सरकारी पत्र सार्वजनिक करत ही माहिती दिली.

आरोग्य सेवा संचालनालयाने ९ जून रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, २०२४, २०२५ आणि २०२६ या कालावधीत मुंबई महापालिकेच्या SAP प्रणालीमध्ये “दुरुस्ती”च्या माध्यमातून करण्यात आलेल्या १९,७३४ जन्मनोंदींची चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात संबंधित नोंदी रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पत्रात जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९, महाराष्ट्र जन्म-मृत्यू नियम २००० आणि RBD Amendment Act 2023 चा उल्लेख करण्यात आला आहे.

>> पान...५ वर

## वीणा विजयन यांना ईडीचे समन्स

अंमलबजावणी संचालनालयाने एक्सालॉजिक-सीएमआरएल प्रकरणात केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या कन्या वीणा विजयन यांना समन्स बजावले आहे.वीणा विजयन यांच्याशिवाय कथित आर्थिक अनियमिततेच्या व्यापक तपासाचा भाग म्हणून कोचीन मिनरल्स एंड रूटाइल लिमिटेड च्या आठ अधिकाऱ्यांनाही ईडीने समन्स पाठवले आहेत.

>> पान...५ वर





### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

## प्रवीणचे कीर्तीचक्र घेताना आईचा बांध फुटला

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**महाराष्ट्राचे वीर सुपुत्र प्रवीण जंजाळ यांच्या मातोश्री शालू जंजाळ आणि त्यांची पत्नी श्यामबाला या राष्ट्रपती भवनात कीर्तीचक्र स्वीकारण्यासाठी आल्या. प्रवीण जंजाळ यांनी गाजविलेल्या शौर्याचा तिथे उल्लेख करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यादेखील आपल्या खुर्चीवरून उतरून पुढे आल्या.**



काश्मीरमधील कुलगाम येथे ६ जुलै २०२४ रोजी दहशतवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या २४ वर्षीय शिपाई प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनात हा सन्मान स्वीकारताना त्यांच्या आई शालू जंजाळ यांना अश्रू अनावर झाले, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचे सांत्वन करत भावनिक आधार दिला

प्रवीण जंजाळ यांच्या वीरतेची कहाणी सांगितली जात असताना त्यांच्या आई शालू यांना अश्रू आवरत नव्हते. त्या आपल्या मुलाला मिळालेला मरणोत्तर पुरस्कार घेताना ओक्साबोक्शी रडत होत्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांच्या समीप पोहोचल्यावर त्यांनी हंबरडा फोडला. राष्ट्रपतींनीही त्यांना जवळ घेत त्यांचे सांत्वन केले. हा एकूण प्रसंग मन हेलावून टाकणारा होता.

सोमवारी नवी दिल्लीत पार पडलेल्या सोहळ्यात मरणोत्तर कीर्ति चक्र प्रदान करण्यात आले. गेल्यावर्षी जुलै महिन्यात जम्मू-काश्मीरमधील कुलगाम येथे दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आले होते. प्रवीण जंजाळ हे महार रेजिमेंटच्या पहिली बटालियन राष्ट्रीय रायफल्समध्ये कार्यरत होते. काल दिल्लीत प्रवीण जंजाळ यांना जेव्हा मरणोत्तर कीर्ति चक्र प्रदान करण्यात आले तेव्हा त्यांची आई शालू जंजाळ आणि पत्नी श्यामबाला जंजाळ उपस्थित होत्या.

या दोघींनी प्रवीण जंजाळ यांचे मरणोत्तर कीर्ति चक्र स्वीकारले. यावेळी भावूक वातावरण पाहायला मिळाले.

मरणोत्तर कीर्ति चक्र प्रदान करण्यासाठी प्रवीण जंजाळ यांच्या नावाची घोषणा झाली तेव्हा त्यांची पत्नी आणि आई राष्ट्रपतींच्या व्यासपीठासमोर आल्या. यावेळी प्रवीण जंजाळ यांनी कशाप्रकारच्या निडरतेने दहशतवाद्यांना नामोहरम केले, याबद्दल सांगण्यात आले.

>> पान...५ वर